**प्रेसनोट** **दिनांक २९/०८/२०१९**

## कोंढवा पोलीस ठाणे पुणे शहर

### गणपती उत्सवा निर्विघ्नपणे पार पाडणे करीता गणेश मंडळाचे अध्यक्ष व कार्यकर्ते यांची बैठक आयोजित केलेबाबत

दिनांक २७/०८/२०१९ रोजी कोंढवा पोलीस ठाण्याचे हद्दीत सिटी लॉन्स,पारगे नगर कोंढवा खु।। पुणे-४८ येथे सायंकाळी १८३० ते २००० च्या दरम्यान मा.अपर पोलीस आयुक्त श्री सुनिल फुलारे सो यांचे अध्यक्षतेखाली मा.सुहास बावचे पोलीस उपआयुक्त परिमंडळ-५ पुणे शहर,मा.सुनिल कलगुटकर सहाय्यक पोलीस आयुक्त वानवडी विभाग पुणे शहर सौ.रासन मॅडम सहाय्यक पोलीस आयुक्त हडपसर विभाग व व.पो.नि अनिल पाटील कोंढवा पोलीस ठाणे पुणे शहर यांचे दिमतीमध्ये गणेश उत्सव निंव्घ्नपणे पार पाडणेबाबत मिटींग आयोजित करण्यात आली होती सदर मिटींगला गणेश मंडळाचे अध्यक्ष व कार्यकर्ते मिळुन एकुण ६०ते ७० जनसुमदाय उपस्थित होता कार्यक्रमाचे सुत्रसंचालन वपोनि पाटील यांनी केले तदनंतर उपस्थित जनसमुदायास आगामी काळात होणा-या गणेशोत्सवा करीता श्री.सुनिल फुलारी मा.अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग पुणे शहर यांनी उपस्थित जनसमुदायास अनधिकृत मंडप न उभारणेबाबत तसेच मंडप उभारणी करीता पुणे महानगरपालिकेची रितसर परवानगी घेणेबाबत तसेच ध्वनी प्रदुषण मर्यादा पाळण्याबाबत सुचना दिल्या जेणे करुन समाजातील अबाल वृध्दाना ध्वनी प्रदुषणाचा त्रास होवु नये याकरिता सुचना दिल्या त्यानंतर श्री.सुहास बावचे यांनी उपस्थित जनसमुदायास गणेशोत्स काळात होणा-या गर्दीच्या अनुषंगाने वाहतुकीचे नियम पाळण्याबाबत व वाहन पार्कींग योग्य रितीने करणेबाबत मार्गदर्शन केले त्यांचे भाषण संपल्यानंतर वपोनि श्री अनिल पाटील कोंढवा पोलीस ठाणे पुणे शहर यांनी उपस्थित जनसमुदायांस कोंढवा पोलीस ठाण्याचे हद्दीत संमिश्र स्वरुपाची लोकवस्ती असल्याने कोणीही कोणाच्या धार्मिक भावना न दुखावण्याच्या व गणेशोत्सव शांतते मध्ये व आनंदमय वातावरणांत पार पाडणेबाबत सुचना दिल्या तदनंतर उपस्थित जनसमुदायांस त्यांचे उपस्थितीबाबत श्री सुनिल कलगुटकर सहाय्यक पोलीस आयुक्त वानवडी विभाग पुणे शहर यांनी आभारप्रदर्शनात्मक भाषण करुन कार्यक्रम संपल्याचे जाहीर करुन सर्व मान्यवरांनी चहा पाण्याचा आस्वाद घेतला



